दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक १०७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.१७ जुलै २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

जगदीप धनखड यांना उपराष्ट्रपतीपदाचे तिकीट

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भाजपच्या संसदीय मंडळाची शनिवारी सायंकाळी बैठक संपन्न झाली. या बैठकीत उपराष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराच्या नावावर चर्चा झाली. भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी पत्रकार परिषद घेऊन जगदीप धनखड यांच्या नावाची घोषणा केली. जगदीप धनखड याआगोदर पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. या ना त्या कारणांवरुन त्यांचा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी संघर्ष होत राहिला, त्यांचा संघर्ष देशात चर्चेचा विषय ठरायचा. आज त्याच धनखड यांना भाजपने उपराष्ट्रपतीपदाची उमेदवारी दिली आहे. ६ ऑगस्ट २२ रोजी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होईल आणि त्याच दिवशी निकालही लागेल. विद्यमान उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांचा कार्यकाळ येत्या ११ ऑगस्ट रोजी संपत आहेत.

मुख्तार अब्बास नक्वी, नजमा हेपतुल्ला आणि केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांची नावे उपराष्ट्रपती पदासाठी चर्चेत होती. मात्र भाजपने बंगालच्या राज्यपालांना उपराष्ट्रपतीपदाचं तिकीट दिलं आहे. यापूर्वी एनडीएने द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपतीपदाची उमेदवारी दिली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा.पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय

कृती समितीच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

दै.रायगड नगरी । पनवेल

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने आज मंत्रिमंडळ बैठकीत घेऊन लाखो भूमिपुत्रांचा सन्मान केला आहे, त्याबद्दल लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्हा भाजपच्यावतीने आज या निर्णयाचे स्वागत करून जल्लोष करण्यात आला.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने २९ तारखेला सरकार अल्पमतात असताना घाईघाईने काही निर्णय घेतले होते. मात्र या निर्णयांबाबत पुढे जाऊन काही कायदेशीर अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून पुन्हा याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास सांगितला होता. आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत नवी मुंबई येथील विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत प्रकल्पग्रस्त शेतकरी भूमिपुत्रांसह सर्व समाजातील व्यक्तीचा सन्मान केला. त्याबद्दल सर्व स्थरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. सदरचा निर्णय जाहीर झाल्यानंतर लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीने मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. यावेळी समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, पनवेलचे माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, गुलाब वझे, जे. डी. तांडेल, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, विनोद म्हात्रे, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

त्याचबरोबर पनवेल तालुका व शहर भाजप कार्यालय येथे उत्तर रायगड भाजपच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषात जल्लोष करण्यात आला. दिबासाहेबांचा विजय असो, दिबासाहेब अमर रहे, अशा गगनभेदी घोषणा देतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही मानण्यात आले.

यावेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य राज पाटील, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के. सी. पाटील, डॉक्टर सेलचे जिल्हा संयोजक डॉ. कृष्णा देसाई, निर्दोष केणी, मधुकर उरणकर यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय चांगला आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सर्व प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा व आनंदाचा हा निर्णय आहे. शेतकऱ्यांचे लढवय्ये नेते, दोन वेळा खासदार, पाच वेळा आमदार, विरोधीपक्षनेते म्हणून दिबासाहेबांनी केलेल्या कामाला तोड नाही. त्यांनी भूमिपुत्रांमध्ये समाजामध्ये ऊर्जा निर्माण केली स्वाभिमान जागृत केला. त्यामुळे त्यांच्या भूमीतील विमानतळाला दिबासाहेबांचेच नाव लागले पाहिजे यासाठी सर्व समाजातील लोकं प्रकल्पग्रस्त शेतकरी भूमिपुत्र एकसंघ झाली. त्या अनुषंगाने भव्य आंदोलने झाली, लढ्याला यश आले. आम्हाला आनंद आहे कि, राज्य सरकारने दिबासाहेबांच्या नावाचा निर्णय घेतला, त्याबद्दल आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो.
>
> **: लोकनेते रामशेठ ठाकूर**

> पनवेल तालुक्यातील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव राज्य मंत्रीमंडळाने केला. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. दिबासाहेब प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र, सर्वांसाठी लढले. त्यांचे नेतृत्व करीत त्यांनी सर्वाच्या जीवनाला नवी दिशा दिली. त्यांच्या या कार्याचा आज गौरव करत राज्य सरकारने जो निर्णय घेतला त्याबद्दल मी पुन्हा आभार मानतो. भूमिपुत्रांच्या सर्व जिल्ह्याने आंदोलनाला साथ दिली. त्या सगळ्यांच्या मागणीचा रेटा तयार झाला. सर्व भूमिपुत्रांचेही अभिनंदन करतो आणि लवकरात लवकर या ठरावाची अमंलबजावणी व्हावी, यासाठी आपण सर्व प्रयत्न करीत राहू या.
>
> **: आ.प्रशांत ठाकूर**

राज्यात पावसाचा ब्रेक

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात गेल्या २ आठवड्यांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. अशात मुंबई, ठाणे, पालघरमध्ये अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांचं मोठं नुकसान झालं. अशात कोल्हापूर, मराठवडा, विदर्भ आणि गडचिरोलीमध्ये पावसाने पुरपरिस्थीती ओढावली होती. पण आता राज्यात पावसाचा जोर कमी होणार असल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रासह मध्य भारतात सध्याचा पाऊस हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे. हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस राहिल, असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. राज्यातील काही धरणं भरली आहे. तर काही धरण क्षेत्रांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात पाऊस होत आहे. अशातच येणाऱ्या काळात पाऊस हा आता हळूहळू ओसरणार आहे. येत्या सोमवारपर्यंत पावसाचा जोर हा कमी कमी होत जाणार आहे आणि मंगळवार, बुधवारनंतर पाऊस उघडीप घेईल, अशी माहिती हवामान तज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी दिली आहे. तर, राज्यातील बऱ्याच भागात पावसाने उसंत घेतलेली पाहायला मिळाली. मुंबईतही आज सकाळपासून पावसाचा जोर ओसरलेला आहे.

पावसाचा आढावा घेतला तर राज्यात आणखी पावसाची गरज आहे. पश्चिम महाराष्ट्रातील धरणं

...‌/२

भाड्याने देणे आहे

जिल्हा सत्र न्यायालय समोरील, लोखंडीपाडा, पनवेल येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क :
९८६७७०४४१६/
९५९४०९३१११

जेएनपीएच्या कामगार विश्वस्त पदांसाठी २ ऑगस्टला जाहीर करण्यात आलेली निवडणूक तडकाफडकी रद्द

दै.रायगड नगरी । उरण

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ऐवजी ॲथोरिटी ॲक्ट स्थापनेनंतर २ ऑगस्ट २०२२ रोजी जाहीर झालेली पहिलीच निवडणूक काही तांत्रिक अडचणींमुळे अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक प्रचाराच्या तयारीला लागलेल्या इच्छुक कामगार संघटनांचा चांगलाच हिरमोड झाला आहे.

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ऐवजी ॲथोरिटी ॲक्ट स्थापन झाला आहे. जानेवारी २०२२ पासून बंदराचे कामकाज या थोरिटी क्टनुसारच सुरूही झाला आहे. दरम्यान तीन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या दोन कामगार विश्वस्तांची मुदत वर्षांपूर्वीच तर आणखी मार्च २०२२ पर्यंत देण्यात आलेली एक वर्षाची मुदतवाढही संपुष्टात आली होती. त्यामुळे एप्रिलमध्ये दोन कामगार विश्वस्त पदांसाठी निवडणूक घेणे अपेक्षित होते. मात्र त्यानंतरही निवडणूकीसाठी निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली नसल्याने दोन कामगार विश्वस्त पदाची निवडणूक मागील चार महिन्यांपासून लांबणीवर पडली होती.

कामगार संघटनांच्या पाठपुराव्यानंतर केंद्रीय श्रम आयुक्तांनी दोन कामगार नियुक्त विश्वस्त पदांसाठी जेएनपीएच्या कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची १२ जुलै रोजी मुंबईत बैठक बोलाविण्यात आली होती.या बैठकीनंतर दोन कामगार नियुक्त विश्वस्त पदांसाठी २ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणूक घेण्याची अधिकृतपणे घोषणा केंद्रीय डेप्युटी चीफ लेबर कमिशनर तेज बहादुर यांनी केली होती.मात्र त्यानंतर तेज बहादुर यांनीच पुन्हा काही तांत्रिक अडचणींमुळे दोन कामगार नियुक्त ट्रस्टी पदासाठी २ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आलेली निवडणूक स्थगित करण्यात येत असल्याचे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आल्यानंतर उत्साहित झालेल्या इच्छूक कामगार संघटना प्रचाराला लागल्या होत्या. काहींनी तर देवीदेवतांचे दर्शन

...‌/२

पनवेल ते वीर रेल्वे नियमित सुरु करण्याची प्रवाश्यांची मागणी

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

संपूर्ण रायगड जिल्हा हा मुंबईला जोडणारा मार्ग असून रायगड जिल्ह्यातील चाकरमान्यांची मुंबईकडे ये जा करण्यासाठी पनवेल ते वीर रेल्वे नियमित सुरु करावी अशी मागणी प्रवाशी वर्गाकडून केली जात आहे.

पनवेल ते वीर रेल्वे मार्ग हा संपूर्ण रायगड जिल्ह्यातील प्रवाश्यांसाठी उपयुक्त मार्ग असून या मार्गांवरील रायगड जिल्ह्यातील पनवेल, पेण, अलिबाग, मुरुड, सुधागड, रोहा, तळा, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, महाड, पोलादपूर, या सर्व तालुक्यातील ही रेल्वे गाडी प्रवाश्यांसाठी मुंबई कडे येजा करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

दिवसेंदिवस या महामार्गावर अनेक औद्योगिक क्षेत्र, शाळा कॉलेज, इंजिनियर कॉलेज, असल्यामुळे सर्व क्षेत्रातील प्रवाश्यांना या रेल्वेचा फायदा होणार आहे. या मार्गावर लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या सुरु असून या ठराविक स्टेशन वर थांबतात. या रेल्वे गाडयांना प्रचंड मोठया प्रमाणात गर्दी असल्यामुळे याचा फायदा रायगड जिल्ह्यातील प्रवाश्यांना होत नाही. रोहा ते दिवा या रेल्वे सुरु असून ती पुढे वीर पर्यंत सुरु केली तर सर्व रायगड जिल्ह्यातील प्रवाश्यांना होणार आहे.

शिवाय रायगड जिल्ह्यातील महामार्गाच्या चौपदरी करणाची गेली बारा ते तेरा

...‌/२

बदलापुरात शिवसेना भुईसपाट, २५ नगरसेवक शिंदे गटात

दै.रायगड नगरी । ठाणे

बदलापुरातील २५ नगरसेवकांनी शिंदे गटाला समर्थन दिलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. आमदारांच्या बंडानंतर शिवसेनेचे पदाधिकारीही शिंदे गटात सामील होताहेत. बदलापुरातील नगरसेवकांच्या पाठिंब्याने ठाण्यापाठोपाठ मुंबईतील उपनगरांत देखील एकनाथ शिंदे यांची ताकद वाढताना पाहायला मिळतीये.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील 'नंदनवन' या निवासस्थानी नगरसेवकांच्या प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी बदलापुरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवकांच्या वतीने एकनाथ शिंदे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. एकनाथ शिंदे यांनीही सर्व नगरसेवकांचं शिंदे गटात स्वागत केलं. आपल्या समर्थनाबद्दल आभारी आहे, महाराष्ट्राच्या प्रगतीचं काम आपल्या हातून घडेल, अशी ग्वाही त्यांनी शिवसैनिकांना दिली.

शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी आपल्या समर्थक २५ नगरसेवकांसह शिंदे गटाला समर्थन दिलं आहे. आमच्या प्रश्नांकडे आणि

...‌/२

हास्य कलाकार स्व.कमलाकर वैशपांयन यांच्या स्मृती दिनानिमित्त आदरांजली

दै.रायगड नगरी । पनवेल

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत नाट्यगृह येथे हास्य कलाकार स्व.कमलाकर वैशपांयन यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. तसेच जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने जेष्ठ हास्य कलाकार, हास्य दरबार फेमदिलीप खन्ना, हास्य सम्राट जॉनी रावत, जादूगार बबन कुमार, निवेदक परेश दाभोलकर, इट बिट्सचे निर्माते कमलाकर बनसोडे, स्टँडअप कॉमेडियन डी. महेश, वादक अजय मातोंडकर, मिमिक्री आर्टिस्ट गुरू कदम, गायक डॉ. गव्हाते सर, खानदेशी कॉमेडियन विजय शिरसाट या कलाकारांना मानचिन्ह देऊन त्यांचे सत्कार केले. यावेळी वादक अजय मातोंडकर यांनी दिवंगत हास्य कलाकार कमलाकर वैशपांयन यांना आपल्या वादनाच्या शैलीत आदरांजली वाहिली.

या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह सह मा.महापौर डॉ. कविता चौतमोल,

...‌/२

शिंदे-फडणवीस मंत्रिमंडळ विस्ताराला नवा मुहूर्त

दै.रायगड नगरी । मुंबई

शिंदे फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराला अखेर मुहूर्त मिळाल्याची चर्चा आहे. येत्या बुधवारी म्हणजेच २० जुलै रोजी नव्या सरकारचा बहुप्रतीक्षित कॅबिनेट विस्तार होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पहिल्या टप्प्यात दहा ते बारा जणांना मंत्रिपदाची शपथ दिली जाणार आहे. आतापर्यंत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा दोघांचेच मंत्रिमंडळ असल्यावरुन विरोधकांनी टीकेचा सूर लावला होता. मात्र पुढच्या चारच दिवसात शिंदे-फडणवीसांच्या साथीला जवळपास बारा मंत्री येणार असल्याचं बोललं जातंय.

पावसाळी अधिवेशनापूर्वी शपथविधीचा पहिला टप्पा होईल. यावेळी कमीत कमी मंत्र्यांचा शपथविधी करण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचं बोललं जात होतं. पहिल्या टप्प्यात म्हणजेच येत्या २० तारखेला भाजपकडून पाच ते सहा जण मंत्रिपदाची शपथ घेण्याची चिन्हं आहेत. तर शिंदे गटातूनही पाच ते सहा जण कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेण्याचे संकेत मिळत आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि दिग्गज नेते राधाकृष्ण विखे पाटील पहिल्या टप्प्यात कॅबिनेट मंत्रिपदाची

...‌/२

न देखवे बुडती लंका

साम्राज्यवादी चीन, अराजकवादी बंडखोर, टपून बसलेले काही लष्करी अधिकारी, तमिळ बंडखोर संघटनांना दिसू लागलेली संधी, तिजोरीतील खडखडाट आणि रस्तोरस्ती फिरणारी भुकेकंगाल संतप्त प्रजा, अशा घनघोर संकटातून श्रीलंकेला कोण आणि कसे बाहेर काढणार, हा मोठा प्रश्न आहे. श्रीलंकेच्या बरबादीत सिंहाचा वाटा उचलणारे पदच्युत अध्यक्ष गोताबाया राजपक्षे सिंगापुरात पोहोचले आहेत. श्रीलंका बुडाली तरी चालेल, राजपक्षे कुटुंब तरले पाहिजे, असा काही डाव असलाच, तर तो तिथल्या न्यायव्यवस्थेने तूर्त तरी उधळून लावला आहे. गोताबाया यांच्या सरकारमध्येच असणाऱ्या इतर दोन भावांना देश सोडून जाता येणार नाही, असा आदेश न्यायालयाने बजावला आहे. दरम्यान, कालपर्यंत राजपक्षे यांच्या ओंजळीने पाणी पिणारे पंतप्रधान रानिल विक्रमसिंघे यांच्यावर हंगामी अध्यक्ष बनून देशाचा गाडा पुढे नेण्याची अत्यंत अवघड कामगिरी येऊन पडली आहे. त्यांनी काम सुरू करताच, 'काही फॅसिस्ट शक्ती देशात असंतोष माजविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि तो खपवून घेतला जाणार नाही,' असा इशारा दिला आहे. कोणत्याही राज्यकर्त्याला असे म्हणावेच लागते; तसेच नागरिक क्रोधित होऊन रस्त्यांवर उतरतात, तेव्हा त्यांच्या हातात जळते पलिते देणारे किंवा शक्य झाले तर बंदुकाही सोपविणारे तयार असतात. हे जगभरात घडत आले आहे. श्रीलंकेसारख्या देशात आधी असंतोष माजावा आणि नंतर हा देश आपला अंकित होऊन आपल्या मर्जीने हाकता यावा, हे स्वप्न काही केवळ चीन पाहात असेल, असे नाही. हिंदी महासागरातील श्रीलंकेचे अनन्य स्थान लक्षात घेता, आज ना उद्या तेथे आपला तळ असावा, असे कोणत्याही जागतिक शक्तीला वाटू शकते. आपले स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व राखण्याचे असे आव्हान तमिळी वाघांचे बंड ऐन भरात असतानाही कधी श्रीलंकेसमोर उभे ठाकले नव्हते. आधीची सर्व कर्जे थकलेली. व्याजही देता येत नाही. जगातून आवश्यक गोष्टी येत नाहीत आणि परकीय चलन मिळवून देणारी निर्यात पूर्ण थांबलेली, अशा भयंकर कोंडीत हा भारताच्या तुलनेत चिमुकला देश सापडला आहे. दुर्दैवाने, श्रीलंकेला संकटातून बाहेर काढण्यासाठी जागतिक वित्तसंस्थांनी ज्या वेगाने हालचाली करायला हव्या होत्या, तशा त्या होताना दिसत नाहीत. भारताने मोठ्या प्रमाणात मदत देऊ केली असली आणि तांदूळ व इतर चिजा पाठविल्या असल्या, तरी श्रीलंकेला या खाईतून बाहेर काढण्याची जबाबदारी अजून तरी घेतलेली दिसत नाही. कदाचित, या सत्तांतरानंतर भारताची भूमिका बदलू शकेल. नव्या सरकारशी मदत देण्याबाबत काही करार-मदार करून मग यात उतरावे, असाही विचार चालू असेल; मात्र श्रीलंकेला वाचविणे, हे भारताचे नैतिक कर्तव्यच आहे. या भूमीशी भारताचे काही हजार वर्षांचे संबंध आहेत. श्रीलंकेचे सगळे नागरिक ही आपली सांस्कृतिक भावंडे आहेत. याशिवाय, दिसेल त्या भूमीचा घास घेण्यासाठी टपलेला चीन श्रीलंकेत शिरजोर होणार नाही, हे भारताने पाहणे आवश्यक आहे. त्यात श्रीलंका आणि भारत या दोघांचेही दीर्घकालीन हित दडलेले आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकी सिनेटने या आधीच केलेल्या एका ठरावाकडे लक्ष द्यायला हवे. सिनेटने भारताने श्रीलंकेला दिलेल्या मदतीचे स्वागत करतानाच, भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान या चार देशांच्या 'क्वाड' या गटाने पुढाकार घेऊन श्रीलंकेला मदत करायला हवी, असे म्हटले आहे. या सूचनेनंतर या चारही देशांनी ठोस एकत्रित कृती केलेली नाही. काही काळापूर्वी युक्रेनचा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा भारताने इतर 'क्वाड' सदस्यांपेक्षा वेगळी भूमिका घेतली आणि 'क्वाड'चा चीनलक्ष्यी उद्देश इतरांच्या लक्षात आणून दिला होता. आज श्रीलंका हा देश वाचविणे जितके आवश्यक आहे; तितकेच तो पुन्हा चीनच्या कह्यात जाऊ न देणेही आवश्यक आहे. आज श्रीलंकेची जी दिवाळखोर अवस्था झाली आहे, तिला बऱ्याच प्रमाणात चीनही जबाबदार आहे. श्रीलंकेला विकासाचे चिनी मॉडेल; तसेच चिनी कर्जांचा बोजा, हे दोन्ही झेपलेले नाही. अशा वेळी, श्रीलंकेचे नवे राज्यकर्ते पुन्हा चीनच्या कच्छपी लागणार नाहीत, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी भारताने वेगवेगळ्या व्यासपीठांचा वापर करून, श्रीलंकेतील आपले अस्तित्व वाढविण्याची गरज आहे. 'अध्यक्षांसाठी 'हिज एक्सलन्सी' असे अभिधान नसेल, अध्यक्षांचा स्वतंत्र ध्वज नसेल, श्रीलंकेच्या संसदेकडे जुने सगळे अधिकार येण्यासाठी घटनादुरुस्ती करू,' अशी भावनिक फुंकर नवे अध्यक्ष विक्रमसिंघे घालत आहेत. ती महत्त्वाची आहे; मात्र पुरेशी नाही. पर्यटन, चहाची निर्यात, कररचना, सेंद्रिय शेती, परदेशी कर्जे आणि मदत अशा अनेक आघाड्यांवर सतत काही वर्षे काम करीत राहिले, तर श्रीलंका या संकटातून बाहेर येईल. या प्रक्रियेत भारताने अधिक सक्रिय होऊन श्रीलंकेला मदतीचा हात द्यावा. तेच सगळ्यांच्या हिताचे आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेच्या गॅस शवदाहिनीचे खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री व श्रीवर्धनच्या आमदार अदिती तटकरे यांच्या प्रयत्नाने निर्माण करण्यात आलेल्या श्रीवर्धन नगर परिषदेच्या गॅस शवदाहिनीचा लोकार्पण सोहळा आज शनिवारी सायंकाळी चार वाजता पार पडला.

श्रीवर्धन शहरातील मठाच्या स्मशानभूमीजवळ ही गॅस शवदाहिनी बसवण्यात आली आहे. अनेक वेळा पावसाळ्यामध्ये कोणीही व्यक्ती मृत्यू पावल्यास अंत्यसंस्कारासाठी लागणारी लाकडे ओली मिळतात व चिता जळण्यामध्ये फार उशीर होतो. श्रीवर्धन शहरातील सर्व स्मशानभूमी समुद्रकिनारी असल्यामुळे जोरदार वाऱ्याचा त्रास देखील शव दहन करताना होत असे. मात्र आता गॅस शवदाहिनी उपलब्ध झाल्यामुळे श्रीवर्धन मधील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सदर कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक, फैसल हुरजूक त्याचप्रमाणे तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दर्शन विचारे,जिल्हा उपाध्यक्ष डॉ. अबु राऊत, प्रविता माने, श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी व प्रशासक विराज लबडे, तहसीलदार सचिन गोसावी व सर्व राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

बिरमोळे हॉस्पिटल परिसरात आढळला मृतदेह

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल शहरातील बिरमुळे हॉस्पिटल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ५० वर्ष, अंगाने मध्यम, केस काळे, चेहरा उभट असून, अंगात ग्रे रंगाचे हाफ बाह्याचे टीशर्ट व पिवळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे.

या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे, फोन – ०२२-२७४५२३३३ किवा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधावा.

पृष्ठ क्र.१ वरुन...

राज्यात पावसाचा ब्रेक

अद्याप भरायची आहे. यापुढेही पाऊस चांगला असेल. मात्र, मध्यंतरीच्या काळात पावसाची उघडीप असेल. त्यानंतर पुन्हा चांगल्या पावसाचे संकेत आहेत. राज्यात १५ जुलैपर्यंत सरसरीपेक्षा ३० टक्के अधिक पाऊस झाला आहे. त्यामुळे जुलै अखेर, ऑगस्ट आणि सप्टेंबरपर्यंत राज्यातील सर्व धरणं भरतील. यावर्षी पाण्याची चिंता राहणार नाही, अशीही माहिती डॉ. रामचंद्र साबळे यांनी दिली.

मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली. मात्र, सकाळपासून मुंबईत पावसाचा जोर ओसरल्याचं चित्र आहे.

२ ऑगस्टला जाहीर करण्यात आलेली निवडणूक तडकाफडकी रद्द

घेऊन प्रचाराच्या शुभारंभाचा नारळही फोडला होता. मात्र तांत्रिक अडचणींमुळे अनिश्चित काळासाठी जाहीर करण्यात आलेली निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. याआधीच निवडणुकीसाठी सुमारे एक-दीड वर्षांचा विलंब झाला आहे.त्यानंतर जाहीर झालेली निवडणूक तडकाफडकी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक प्रचाराच्या तयारीला लागलेल्या इच्छुक कामगार संघटनांचा चांगलाच हिरमोड झाला आहे.

केंद्र सरकारच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीआधीच कामगार विश्वस्तांची निवडणूक जाहीर करण्यात आली होती. ही बाब निदर्शनास आल्यानंतर केंद्रीय श्रम मंत्रालयाने नाराजी व्यक्त केली आहे. मंत्रालयाच्या नाराजीनंतर केंद्रीय डेप्युटी चीफ लेबर कमिशनर तेज बहादुर यांनी जाहीर केलेला निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असल्याचे कामगार संघटनांच्या प्रतिनिधींकडून सांगितले जात आहे.

पनवेल ते वीर रेल्वे नियमित सुरु करण्याची प्रवाश्यांची मागणी

वर्षांपासून अवस्था बिकट असून या महामार्गावरून प्रवास करणे ही धोक्याचे झाले आहे. यामुळे जर पनवेल ते वीर ही लोकल रेल्वे गाडी तीन तासांनी सुरु करुन कमीत कमी या रेल्वे गाडीच्या दिवसातून पाच फेऱ्या केल्या तर गृहिनी व कॉलेजचे विद्यार्थी यांना पार्ट टाइम नोकरी करुन बेरोजगारी पासून ही सुटका होईल.यामुळे पनवेल ते वीर लोकल रेल्वे गाडी नियमित पणे सुरु करावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

बदलापुरात शिवसेना भुईसपाट, २५ नगरसेवक शिंदे गटात

मागण्यांकडे आपण जातीने लक्ष द्याल, हा विश्वास वाटत असल्याने आम्ही आपणास पाठिंबा देत असल्याचं २५ नगरसेवकांच्या वतीने वामन म्हात्रे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना सांगितलं. त्यावर मुख्यमंत्र्यांनीही मान डोलावून म्हात्रे यांच्या म्हणण्याला समर्थन दिलं.

दरम्यान, नवी मुंबई महानगरपालिकेतील ३३ नगरसेवक, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील १२ नगरसेवक, उल्हासनगर महापालिकेतील १५ नगरसेवक, वसई - विरार मनपातील ५, विक्रमगड नगर पंचायतीमधील जिजाऊ संघटनेचे १९ नगरसेवक, तलासरी नगर पंचायतीतील जिजाऊ संघटनेचे ५ नगरसेवक, मोखाडा नगर पंचायतीच्या १२ नगरसेवकांनी आणि अंबरनाथ नगर परिषदेतील २० नगरसेवकांच्या पाठिंब्याने एकनाथ शिंदे यांचं मुंबई उपनगरांमधील 'राजकीय वजन' वाढलं आहे.

हास्य कलाकार स्व.कमलाकर वैशपांयन यांच्या स्मृती दिनानिमित्त आदरांजली

मा.सभागृह नेते परेश ठाकूर, साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रवींद्र पाटील, पनवेल अर्बन बँक संचालिका श्रीमती.माधुरी गोसावी, मा.उपमहापौर सौ.सितताई पाटील, मा.नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, मा.नगरसेविका सौ.प्रीती जॉर्ज, मा.नगरसेविका सौ.दर्शना भोईर तसेच हास्य कलाकार उपस्थित होते.

शिंदे-फडणवीस मंत्रिमंडळ विस्ताराला नवा मुहूर्त

शपथ घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर शिंदे गटातून पहिल्या टप्प्यात कोणाची वर्णी लागणार, याची उत्सुकता आहे.

खरं तर मंत्रिमंडळ विस्तार १७ किंवा १९ जुलैला ठेवला जाण्याची शक्यता सुरुवातीला वर्तवली जात होती. १८ जुलै रोजी राष्ट्रपतीपदासाठी मतदान होणार आहे. त्यावेळी सर्वच आमदारांना मुंबईत यावे लागणार आहे. त्यामुळे मतदारसंघातून त्यांना पुन्हा-पुन्हा मुंबईत यावे लागू नये, यासाठी आसपासची तारीख ठरली होती.

एकनाथ शिंदे यांच्यासोबत ४० शिवसेना आणि १० अपक्ष अशा ५० आमदारांचं पाठबळ आहे. चौघांच्या मागे एक, या सूत्रानुसार शिंदे गटाला एकूण १३ मंत्रिपदं मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपद अशी एकूण संख्या आहे. शिंदे गटात असणाऱ्या पाच जणांकडे ठाकरे सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रिपदं होती. एकनाथ शिंदे वगळता चार जणांसोबत आणखी एकाला सुरुवातीलाच मंत्रिपदाची शपथ मिळण्याची शक्यता आहे.

आषाढी एकादशीच्या दिवशी मजगांवमध्ये दुमदुमला विठ्ठल नामाचा गजर

दै.रायगड नगरी । कोर्लई

विठूचा गजर, गजर हरिनामाचा झेंडा रोवला,पंढरी निवासा सख्या पांडुरंगा,पंढरीसी जाता मिळे सर्व सुख अशा सुमधुर सुश्राव्य बहारदार भजनाच्या तालावर आषाढी एकादशीच्या दिवशी मुरुड तालुक्यातील मजगांवमध्ये बापदेवपाडा प्रासादिक भजन मंडळातर्फे आगरी समाज विठ्ठल मंदिर, बाजारपेठेतील गणपती मंदिर व कुंभार वाड्यातील संत गोरोबा काका मंदिरात विठ्ठल नामाचा गजर दुमदुमला !

मजगांव मध्ये आषाढी एकादशी निमित्ताने बापदेवपाडा प्रासादिक भजन मंडळातर्फे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.यादिवशी कोळी समाज खारदोडकुले येथील आगरी समाज विठ्ठल मंदिरामध्ये, बाजारपेठेतील गणपती मंदिरात आणि कुंभार वाड्यातील संत गोरोबा काका मंदिरात झालेल्या कार्यक्रमात बुवा प्रकाश कांबळे, बुवा नरेश भेर्ले, बुवा जनार्दन बिरवाडकर, बुवा बाळकृष्ण वाडकर यांच्या सुश्राव्य बहारदार भजनाने भाविकांची मने रिझवली ! भजनाला पखवाज वादक विहूरचे माजी सरपंच रमेश दिवेकर यांनी उत्कृष्ट साथ दिली.

जाहीर नोटीस

अनुदिप सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०६, येथील सर्व्हे क्र.१०० हिस्सा क्र.४ व ५, पनवेल, तर्फे सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी बांधकाम क्षेत्रातील (पुनर्विकास प्रकल्प व्यवस्थापक) आर्किटेक्ट / प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्स्ट (PMC) म्हणून नेमणूक करावयाची आहे. हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या नोंदणीकृत, अनुभवी व कमीतकमी १५ (पंधरा) वर्षे बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक व व्यवस्थापकीय अनुभव असलेल्या कन्सल्टंन्स्ट व्यक्ती अथवा संस्था / कंपनी यांचेकडून देकार मागविण्यात येत आहेत. याकामी देकार स्वीकारण्याची अंतिम तारीख ही दि.०१/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० (P.M.) वाजेपर्यंत असेल. या कामासाठी आलेले देकार स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे गृहनिर्माण संस्था कमिटी स्वतःकडे राखून ठेवत आहे.

स्थळ : पनवेल
दिनांक : १६/०७/२०२२

सही/-
अध्यक्ष/सचिव
अनुदीप सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
सर्व्हे क्र.१००, हिस्सा क्र.४ व ५,
मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड
मो.क्र.९८१९११८६०५/९६१९२५५२६५

PUBLIC NOTICE

Take Note that My Client, **SANGITA DATTATRAY GAVLI** had lost original copy of 1. Allotment Letter dated 10/03/1993, 2. Possession Letter dated 18/10/1993 3. Agreement for Hire Purchase date 18/10/1993 between City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd., (CIDCO) as 'The Corporation' and Mr.Shivaji Umamaji Deokule & 4. Deed of Assignment dated 12/09/1997 dully registered before the office of Sub-Registrar, Thane 3 bearing registration no.3325/1997 dated 12/09/1997 between Mr.Shivaji Umamaji Deokule through constituted power of Attorney Mr.Syed Mohammed Jawad Kirmani and Mr.Syed Mohammed Jawad Kirmani in respect to flat bearing flat no. 2:3, Bldg. No.A-12, Second Floor, Ashtavinayak CHS. Ltd, Sector-8 B, CBD Belapur, Navi Mumbai-400614. Any person who finds the above documents is directed to deliver the same at the below mentioned address within 15 days from the date of publish.

Date : 14/07/2022
Navi Mumbai

SD/-
ADVOCATE VANDANA
610, Prabhat Centre Annexe, 6 th Floor, Sector-1 A, CBD-Belapur,
Navi Mumbai-400614

मा.गोडसे साहेब यांचे कोर्टात

वकील : ॲड.डी.पी.घरत

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

स्पे.मु.क्रं.२५५/२०२०
नि.नं.२६/ड
ने.ता.२८/०७/२०२२

श्रीमती.अंजना रामदास कुरंगळे — वादी
विरुद्ध
सौ.माधुरी मुकूंद जोशी वगैरे — प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्र.१. सौ.माधुरी मुकूंद जोशी
प्रतिवादी क्र.२. श्री.मुकूंद वसंत जोशी

वरील प्रतिवादी क्र.१ व २ यांचा
पुर्वीचा पत्ता : रा.सदनिका क्र.११, दुसरा मजला,
कल्पतरु सहकारी गृहनिर्माण संस्था, मौजे : रिस,
मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड

वरील प्रतिवादी क्र.१ व २ यांचा
कायमचा पत्ता : फेज-३, भास्कर राव नगर,
रा.प्लॉट नं.६७, गोकुलम, सिकंदराबाद, जि.हैदराबाद,
राज्य : तेलंगणा, पिन-५०००९४

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

वादी यांनी प्रस्तुतचा दावा दि.२१/०६/२०१७ रोजीच्या कराराची विशेष पुर्तता (स्पेसिफिक परफॉर्मन्स) करून मिळणे करिता, ठरावा करिता, निरंतरचे व तुर्तातुर्त मनाई हुकूमा करिता तदनुषंगिक मागण्याकरिता, प्रतिवादी यांचे विरुद्ध दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांस नमूद पत्यावर समन्सची बजावणी होत नसल्याने सदर सी.पी.सी. ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे जाहीर नोटीसीद्वारे प्रतिवादी क्र.१ व २ यांस दाव्याचे समन्सचे बजावणी करिता दाव्याची पुढील तारीख २८/०७/२०२२ ही नेमलेली असून नमूद तारखेस तुम्ही हजर न राहिल्यास वादी दाव्यावर तुमचे कुठल्याही प्रकारचे म्हणणे नाही असे समजून तुमचे विरुद्ध मे.कोर्टाचे एकतर्फी हुकूम करणेचा आदेश करणेत येईल.

ही जाहीर नोटीस आज दि.१६/०७/२०२२ रोजी सहीनिशी आणि न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल	कोर्टाचा शिक्का	सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत वसंत पांडुरंग मुंबईकर यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
वेश्वी, ता.उरण, जि.रायगड	२९/१	०-०५-००	०.०९
	२९/६	०-०८-००	०.३१
	२९/२९	०-२७-००	०.६९

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१६/०७/२०२२

सही/-
कनू एम.ठक्कर
७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,
घाटकोपर (पू), मुंबई-४०००७७
मो.नं.९३२२५५१४१४

मे.मुजावर सो. यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
ॲड.हर्षदा सुनील गडकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६८८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०९/२०२२

१) श्रीमती.सना समीर गौरी
वय वर्षे : ३२, धंदा : गृहिणी
२) कु.रेहान समीर गौरी
वय वर्षे : १२, धंदा : शिक्षण
तर्फे अज्ञानपालनकर्ती आई अ.क्र.१
३) कु.अफान समीर गौरी
वय वर्षे : १०, धंदा : शिक्षण
तर्फे अज्ञानपालनकर्ती आई अ.क्र.१
अ.क्र.१ ते ३ सर्व रा.फ्लॅट नं.५०२
पाचवा मजला, पाइन वुड टॉवर, प्लॉट
नं.०५, सेक्टर नं.०९, तळोजा पाचनंद
खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
४) श्रीमती.नसीम सिराजुदीन गौरी
वय वर्षे : ६४, धंदा : गृहिणी
रा.एन एल-५, बिल्डींग नं.१८,
रुम नं.०६, पहिला मजला, सेक्टर नं.३,
नेरुळ नोड ३, नवी मुंबई, जिल्हा : ठाणे
निवास बिल्डींग, ओंकारेश्वर मंदिराजवळ,
सध्या रा.फ्लॅट नं.५०२, पाचवा मजला,
पाइन वुड टॉवर, प्लॉट नं.०५, सेक्टर ०९,
तळोजा पाचनंद, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ हिचे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे वडील आणि अर्जदार क्र.४ चा मुलगा समीर सिराजुद्दीन गौरी यांचे तारीख ०५/१०/२०२१ रोजी पनवेल येथे निधन झाले. मयत समीर सिराजुद्दीन गौरी यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

शॉप नं.१७, क्षेत्र २४० चौ.फूट बिल्टअप, तळमजला, हरी मधुर मिलन को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.४१, सेक्टर नं.५, नवीन पनवेल (पु), जिल्हा : रायगड या वाणिज्य वापराच्या दुकान गाळ्यातील निम्मा अविभक्त मालकी हक्क-हिस्सा ही मिळकत

आणि

फ्लॅट नं.३०२, तिसरा मजला, प्रभाकर निवास बिल्डींग, सिटी सर्व्हे नं.२७२, २७२/१, २७२/२, पनवेल तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड या निवासी सदनिकेतील निम्मा अविभक्त मालकी हक्क-हिस्सा ही मिळकत

वरील दुकान व गाळा निवासी सदनिका या मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जददार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल	कोर्टाचा शिक्का	सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

पुई येथे महिलांचे आर्थिक साक्षरता शिबिर संपन्न

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रा.जि.मध्यवर्ती सह.बँक अलिबाग कोलाड शाखेतर्फे महिलांचे आर्थिक साक्षरता शिबिर तालुक्यातील पुई या गावी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

राष्ट्रीय क्रुषी ग्रामीण विकास बँक नाबार्ड यांच्या आणि. रा.जि.मध्यवर्ती सह.बँक अलिबाग कोलाड शाखेच्या वतीने पुई येथे संपन्न झालेल्या आर्थिक साक्षरता शिबिर प्रसंगी कोलाड शाखाधिकारी भावना सरफळे, प्राथ.शाळेतील शिझिका साजन पाटील,सर्व ग्रा.पं.सदस्या, सीआरपी बँक सखी. ॲनीमेटरसह विविध महिला बचत गटातील सदस्या उपस्थित होत्या. सदर मेळाव्यात शाखाधिकारी भावना सरफळे यांनी बँकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या सर्व सुविधा व योजनांची माहिती दिली यामध्ये प्रामुख्याने बचत गटाबाबत वैयक्तिक ठेवी व कर्ज योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना आदींबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच होम सेव्हिंग्ज योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी यावेळी त्यांनी आवाहन केले.त्याचप्रमाणे बचत गटातील महिलांच्या अडी अडचणी समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तर उपस्थित महिला वर्गाने आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्याबद्दल समाधान व्यक्त करून यापुढेही असेच सहकार्य लाभावे व आमच्या समस्या समजावून घ्याव्यात अशाप्रकारचे मनोगतातून व्यक्त केले.शेवटी शाखाधिकारी भावना सरफळे यांनी बँकेच्या वतीने उपस्थितीतांचे आभार व्यक्त करून या शिबिराची यशस्वीरित्या सांगता करण्यात आली.

सर्पमित्रांना ओळखपत्र, मोफत उपचार आणि विमा संरक्षण द्या

दै.रायगड नगरी । उरण

जागतीक सर्प दिनाचे औचित्य साधून सर्पमित्रांना शासन मान्य अधिकृत ओळखपत्र तसेच स्नेक रेस्क्यू ऑपरेशन करताना सर्पदंश झाल्यास मोफत उपचारासोबत त्यांना विमा संरक्षण कवच मिळण्याबाबत उरण वनविभागाचे वन क्षेत्रपाल एन. जी. कोकरे यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे मागणी वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी यांनी केली. यावेळी परिमंडळ वनअधिकारी संजय पाटील उपस्थित होते. सर्प वाचवा निसर्ग वाचवा असे आवाहन वन विभाग करीत असतो. एखादा साप नागरीवस्तीत आढळून आल्यास सर्पमित्रांना बोलावून सापाला त्यांच्या स्वाधिन करतात. पकडेला साप हा जंगल परिसरात मुक्त करुन सर्पमित्र सापाला जीवनदान देण्याचे कार्य करीत असतात. ह्यासाठी सर्पमित्रांना कोणतेही मानधन नसताना ही स्वखर्चाने ही निसर्गसेवा करीत असतात. बरेच सर्पमित्र हे वयक्तिकरित्या तर काही सर्पमित्र हे आपल्या संस्थेच्या माध्यमातून सर्प वाचवा मोहित राबवित असतात. पर्यावरण व वन्यजीव संरक्षणात सर्पमित्रांचे खुप मोठे योगदान आहेत.

Hon'ble Gunnal Judge

Adv.Prakash Choudhary

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) AT PANVEL
MISC.APPL.NO.1050 OF 2022
Exh : 8/D
N.D.06/09/2022

In the matter of issue of HEIRSHIP CERTIFICATE of the deceased Late Mr.RAVISH SURESH CHOHAN who expired on 13 th April, 2021 at Delhi, AS PER PROVISIONS contained in Sec.2 Bombay Regulation No.VIII of 1827

Smt.MANJU CHOHAN W/o
RAVISH CHOHAN
Indian Aged 54 Years,
Resident of Flat No.122-C
AP-Block Pitampura Saraswati Vihar
North West Delhi-110034 Applicant

That Late Mr.RAVISH SURESH CHOHAN who is the husband of the Applicant expired on 13 th April 2021 at Delhi.

The descriptions of the properties in the name of the deceased are as under.

SCHEDULE OF THE PROPERTY

Shop No.10, Ground Floor Plot No.170, "Tulsi Gourav" Sector-02 Ulwe Taluka-Panvel District-Raigad.

Flat No.A-902, Ninth Floor, Plot No.170, "Tulsi Gourav" Sector-02 Ulwe Taluka-Panvel District-Raigad.

Whereas the abovenamed applicant hs filed Misc. Applicantion for Heirship Certificate under Bombay Regulations VIII of 1827, in the Court of Civil Judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D.) Panvel, in person of by pleader duly instructed and to file your say/ Objections, in any, within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice, failing which the said application will be heard presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand and seal of the court this 14 day of July, 2022

Sd/-
Jr.Clerk
Civil Judge
(S.D.) Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitent.
Civil Judge
(S.D.) Panvel

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत भाविकांची गर्दी ; बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रांगा

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

भारतीय हवामान खात्याने रायगड सह कोकणाला दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानुसार सलग सहा दिवस मुसळधार पावसाने हाहाकार माजविला. नद्यांना पूर येऊन सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली. अशातच आश्चर्य वाटावे असेच घडले. आभाळात दडून बसलेल्या सूर्य दर्शनासह

संकष्टीच्या दिवशी चक्क पावसाला ब्रेक मिळाला.आणि संकष्टी चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत भाविकांची गर्दी पहावयास मिळाली. शनिवार ,रविवार सुट्टी असल्याने महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ असलेले पालीतील बल्लाळेश्वर मंदिर शनिवारी (दि.१६) रोजी संकष्टी चतुर्थीला भाविक भक्तगणांनी फुलून निघाले. संकष्टीनिमित्त श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. पावसाने दडी मारल्याने व कडकडीत ऊन पडल्याने गणेश भक्त व भाविकांनी बल्लाळेश्वर दर्शनाचा बेत आखला. पाली शहर भाविकांनी न्हाऊन निघाले.

शनिवार असल्याने दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदा देखिल तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला.

संकष्टी निमित्त मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार , फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. बल्लाळेश्वराचे मनोभावे दर्शन केल्यानंतर भाविकांच्या चेहऱ्यावर एक आगळेवेगळे समाधान दिसून येत होते. कोव्हीडचे प्रमाण कमी झाल्याने बल्लाळेश्वर मंदिर व परिसर भाविकांनी फुलून निघतो आहे. बल्लाळेश्वर ट्रस्टने कोरोनाकाळात विशेष खबरदारी घेत उपाययोजना केल्या होत्या. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आली आहे.

रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे. तसेच सुसज्ज स्वच्छता गृह देखिल उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. असे देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष जितेंद्र गद्रे व विश्वस्त मंडळाने सांगितले.

अल्पवयीन मुलीचे अपहरण

दै.रायगड नगरी । पनवेल

नावडे फाटा तळोजे परिसरातून एका अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना घडली आहे.

कु. सुरेखा रामचंद्र केवट (वय- १५वर्षे) अंगाने मध्यम, रंग गव्हाळ, उंची ४.३ फुट, चेहरा उभट, केस काळे मध्यम वाढलेले, डोळे काळे अंगात गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस परिधान केलेला आहे तसेच सदर मुलीला हिंदी व भोजपुरी भाषा बोलता येते.

मा.गोडसे सो

अर्जदाराचे वकील
ॲड.करिष्मा श. म्हात्रे
ॲड.सुमित अ. म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५७०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०८/२०२२

कै.विजय कृष्णा घरत (मयत तर्फे वारस)
१) श्रीमती.शशिकला विजय घरत
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.स्नेहल विजय घरत
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.सुधर्म विजय घरत
वय : २२ वर्षे, धंदा : काही नाही
अनु क्र.१ ते ३ हे सर्व
रा.धाकटी जुई, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

१) ज्याअर्थी कै.कृष्णा पांडुरंग घरत यांचे निधन मौजे : धाकटी जुई, ता.उरण, जि.रायगड येथे दि.०७/०६/२०१४ रोजी मृत्यू पावले आहेत. त्यांच्या मालकीच्या शेतजमिनी मौजे : रा.विंधणे, ता.उरण, जि.रायगड असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार
विंधणे	२६६ (१४)	५	०-९९-६० पो.ख. ०-१७-४० एकूण ०-११७-००	११ रु.
विंधणे	२६६	१	०-५२-१० पो.ख. ०-०७-०० एकूण ०-५९-१०	५ रु. २८ पै.
विंधणे	१२४	३	०-०७-४० पो.ख. ०-०१-२० एकूण ०-०८-६०	०.५६ पै.
विंधणे	१२२	१ ब	०-६३-०० पो.ख. ०-२०-०० एकूण ०-८३-००	३रु. ८७ पै
विंधणे	११५	२८	०-११-०० पो.ख. २-७८-७० एकूण २-८९-७०	०.१९ पै.

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असे.

कै.कृष्णा पांडुरंग घरत यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे मृत्यूपत्राप्रमाणे वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा प्रोबेट दाखला मिळण्यासाठी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदारास प्रोबेट दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.१४ माहे जुलै सन २०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

Hon'ble Mujawar Judge

Adv.Prakash Choudhary

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) AT PANVEL
MISC.APPL.NO.999 OF 2022
Exh : 8/D
N.D.06/09/2022

In the matter of issue of HEIRSHIP CERTIFICATE of the deceased Late Mr.VILAS SADASHIV KHARKAR who expired on 13 th May, 2022 at Ulwe, AS PER PROVISIONS contained in Sec.2 Bombay Regulation No.VIII of 1827

1) Smt.SHANTA VILAS KHARKAR
Indian, Aged 39 years,
Resident of Mukam Post Ulwa
Kharkar Ali, Taluka-Panvel,
Dist Raigad-410206
2) Miss.Vaishali Vilas Kharkar @
Mrs.Vaishali Akshay Bhoir
Indian, Aged 22 years,
Resident of Mukam Post Ulwa
Kharkar Ali, Taluka-Panvel,
Dist Raigad-410206
3) Miss.Riddhi Vilas Kharkar
(Through his mother and natural
Guardian Mrs.Shanta Vilas Kharkar)
Indian, Aged 16 years,
Resident of Mukam Post Ulwa
Kharkar Ali, Taluka-Panvel,
Dist Raigad-410206
4) Smt.Dwarkabai @
Doraku Sadashiv Kharkar
Indian, Aged 75 years,
Resident of Mukam Post Ulwa
Kharkar Ali, Taluka-Panvel,
Dist Raigad-410206 Applicants

That Late Mr.VILAS SADASHIV KHARKAR who is the husband of the Applicant No.1 and father of Applicant No.2 and 3, and son of Applicant No.4 expired on13 th May 2022 at Ulwe Taluka-Panvel, Dist-Raigad

The descriptions of the properties in the name of the deceased are as under.

SCHEDULE OF PROPERTY

Plot No.19E, Sector-25 A, Pushpak Node, Taluka Panvel, District-Raigad admeasuring area of 779.83 sq.mtrs.

Whereas the abovenamed applicant has filed Misc. Applicantion for Heirship Certificate under Bombay Regulations VIII of 1827, in the Court of Civil Judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D.) Panvel, in person of by pleader duly instructed and to file your say/ Objections, in any, within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice, failing which the said application will be heard presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand and seal of the court this 12 day of July, 2022

Sd/-
Jr.Clerk
Civil Court
(S.D.) Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitent.
Civil Court
(S.D.) Panvel

रोह्यात साथीच्या आजारात वाढ, डेंग्यूने डोके वर काढले

दै.रायगड नगरी । उरण

पावसाने उशिरा प्रारंभ केल्याने डबक्यात साठलेल्या सांडपाण्यातील डेंग्यूच्या आळ्या अधिक प्रभावी ठरल्या, रोहा तालुक्यात डेंग्यूने घेरले असून साथीच्या आजारात वाढ झाली आहे. डेंग्यूची अनेकांना लागण झाली, लहान मुले ही आजारी पडले असून तालुका आरोग्य यंत्रणेने डेंग्यू समोर हात टेकल्याचे चित्र आहे. डेंग्यूंच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन तालुका प्रशासनाने केले आहे.

रोहा शहर व परिसरातील अनेक इमारतीच्या आवारात विविध बांधकामासाठी खोदण्यात आलेल्या डबक्यात डासांच्या आळ्या आढळून आल्या. याच परिसरातील नागरिक, लहान मुलांना डेंग्यूने घेरल्याचे अनेकदा समोर आले. अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयात भरती व्हावे लागले. आता लहान मुलांना डेंग्यू सदृश्य तापाची लक्षणे दिसत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत. वाढत्या डेंग्यूच्या प्रादुर्भावाने तालुका आरोग्य विभागाने डासक्षेत्राची पाहणी केली. त्यात बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी डासांचे अनेक पॉझीटीव्ह कंटेनर तसेच डासांच्या आळ्या सापडल्याने यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. येथिल संशयीत डेंग्यू रुग्ण खाजगी दवाखान्यात आढळून येत आहेत. त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी यांनी सर्वेक्षण केले. बांधकाम व्यवसाय ठिकाणी डासांच्या आळ्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्या. हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या इत्यादी साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव करणारे डास आढळून आल्याने तातडीने उपाययोजना कराव्यात अशा सूचना तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला केल्या. नालेसफाई करणे, अळीनाशक फवारणी, धुरफवारणी कराव्यात, त्वरीत उपाययोजना न केल्यास परिसरात डेंग्यू, चिकुनगुनियी साथ प्रभावी पसरू शकते. मृत्यू होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही असा ईशारा आरोग्य विभागाने दिल्याने ग्रामपंचायत प्रशासन अधिक सतर्क झाले आहे.

अर्जदाराचे वकील ॲड.सलमान पटेल

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९९१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०८/२०२२

१) रुबीना ईब्राहीम पटेल लग्नानंतर
श्रीमती.रुबीना फारुक पेशिमाम
वय : ४० वर्षे, धंदा : घरकाम
२) कु.समीना ईब्राहीम पटेल
वय : ३० वर्षे, धंदा : घरकाम
३) पै.ईलियास ईब्राहीम पटेल (मयत) तर्फे वारस
३/१) कु.ईकरा ईलीयास पटेल
वय : १६ वर्षे, धंदा : विद्यार्थी
३/२) कु.आयश ईलीयास पटेल
वय : १२ वर्षे, धंदा : विद्यार्थी
३/३) कुमार.आनस ईलीयास पटेल
वय : १५ वर्षे, धंदा : विद्यार्थी
(अर्जदार क्र.३/१ ते ३/३ यांचे अज्ञान पालनकर्ती
आई श्रीमती.समीना ईलीयास पटेल)
अर्जदार क्र.१ रा.हिल व्ह्यू अपार्टमेंट,
सदनिका क्र.१०५, ए-विंग, बंदर रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
अर्जदार क्र.२ व ३/१ ते ३/३ रा.घर क्र.७६५,
ओवे गाव, सेक्टर ३०, खारघर,
नवी मुंबई-४१०२१० अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ व २ ची बहिण व अर्जदार क्र.३/१ ते ३/३ ची आत्या पै.रेशमा ईब्राहीम पटेल ही दि.२७/०१/२०२२ प्राईप क्रिटी केयर हॉस्पिटल ठाणे येथे अविवाहित मयत झालेली आहे. पै.रेशमा ईब्राहीम पटेल यांची सहहिस्सेदारांबरोबर मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील त्यांचे मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती / शेतजमिनी होत्या.

मिळकतीचे वर्णन

अ.क्र.	मौजे	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार
१	ओवे	४४०	६	६-७-८A ३	०-८६-०	१४.९०
२	ओवे	७०	२९०	१	२-७३-०	६.००
३	ओवे	७०	२९१	४	०-६७-८	६.१२
४	ओवे	७०	२९३	१ C	०-१०-०	०.३१
५	ओवे	७०	२९३	१ E	०-०१-०	०.०३
६	ओवे	६९	२९१	१	०-२७-३	३.७५
७	ओवे	६९	३०३	३	०-५२-०	८.१२
८	ओवे	६९	४२	१	०-१३-०	०.४४
९	ओवे	६९	३७८	२	०-०९-०	१.४४
१०	ओवे	७०	३७९	६ A	५-१५-०	१३.२६
११	ओवे	३३३	४१	२	०-३६-७	६.८७
१२	ओवे	४३७	२९१	५	०-२९-३	४.००
१३	ओवे	४६३	७३	१	०-८४-०	२.३१
१४	ओवे	३५+८५	५१	३ A	०-२०-०	३.९१
१५	ओवे	४६०	२९७	६	०-३२-०	०.७८
१६	ओवे	३४४	९	१	१०-८०-०	६.९४
१७	ओवे	३४३B	२९३	५ A	३-१४-०	१०.०४

मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत. सबब सदर संपादीत मिळकतीबाबत पै.रेशमा ईब्राहीम पटेल यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२/७/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

कामगार क्षेत्रात काम करताना ईश्वरीय काम हा विचार असला पाहिजे : सुधीर घरत

भारतीय मजदूर संघ
अखिल भारतीय अभ्यास वर्ग

दै.रायगड नगरी । उरण

भारतीय मजदूर संघ संलग्न असणाऱ्या ३२ महासंघांचे आखिल भारतीय पाच दिवशीय अभ्यासवर्ग शिबीर १३ जुलै ते १७ जुलै २०२२ या कालावधीत हेडगेवार स्मृती भवन, रेशीमबाग – नागपूर येथे संपन्न होत आहे. या शिबिरात भारतीय मजदूर संघाला संलग्न असणाऱ्या ३२ महासंघाचे सुकाणू समितीचे १२४ पदाधिकारी सहभागी झाले आहेत.

यावेळी भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाच्या वतीने राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले कि, कामगार क्षेत्रात काम करताना हे एक ईश्वरीय काम आहे हि भावना मनात ठेवून काम केल पाहिजे. कुणाला खुश करण्यासाठी नव्हे तर आत्मप्रेरणेने काम केले पाहिजे. संघटनेत विचार अनेक असू शकतात परंतु अंतिम ध्येय एकच असलं पाहिजे त्यासाठी सर्वांचे विचार ऐकून एकच विचार झाला पाहिजे तरच संघटन मजबूत राहतं ते तुटत नाही.

या आखिल भारतीय अभ्यासवर्गाचे उदघाटन भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हिरण्मय पंड्या यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले. या अभ्यास वर्गात देशातील सर्व राज्यातील भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या केंद्र सरकारी व राज्य सरकारच्या विविध उद्योगातील संघटनांचे अखिल भारतीय महासंघाचे अध्यक्ष, महामंत्री, संघटन मंत्री, कोषाध्यक्ष उपस्थित आहेत. भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाच्या वतीने प्रभारी चंद्रकांत (अण्णा) धुमाळ व महामंत्री सुरेश पाटील उपस्थित आहेत.

या पाच दिवशीय अभ्यासवर्ग शिबिरात भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय नेते मार्गदर्शन करणार आहेत. २३ सत्रांमध्ये भारतीय मजदूर संघाची संघटना संस्कृती, मौलीक सिद्धांत, नवीन लेबर कोड, वर्तमान आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक मूल्ये आणि कुटुंब व्यवस्था, व्यवस्था परिवर्तन व कामगार संबंधित अन्य विविध विषयांवर मार्गदर्शन होणार आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

‘बाटू’च्या लायब्ररीच्या इमारतीला पावसाळ्यात गळती सुरू

गळती रोखण्यासाठीचे तंत्र व शास्त्र विकसित करण्याची गरज

दै.रायगड नगरी । पोलादपूर

महाराष्ट्र राज्यातील अनेक अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र तसेच पेट्रोकेमिकल, केमिकल आणि आयटी, कॉम्प्युटर क्षेत्रातील नामवंत महाविद्यालयांना लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठाशी संलग्न करून राज्यातील विविध विभागामध्ये ‘बाटू’चे एक उपकेंद्र सुरू ठेवण्याचा घाट राज्यसरकारकडून सुरू असल्याबद्दल महाविद्यालयांमार्फत छुपी नाराजी उघड झाली होती. मात्र, दुसरीकडे याच ‘बाटू’च्या इमारतीला पावसाळ्यामध्ये गळती सुरू झाली असून गळती रोखण्यासाठीचे तंत्र व शास्त्र विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे.



लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ परिसरामध्ये कॉलेज ऑफ पेट्रोकेमिकल इन्स्टिट्यूटच्या इमारतीच्या स्लॅबवर गळती काढण्यासाठी छप्पर बसविण्याचे काम पावसाळ्यापूर्वी पुर्ण झाले नाही. दुसरीकडे याच लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठाची संसदभवनासारखी भव्य इमारतदखील गेल्यावर्षी पावसाळ्यामध्ये गळत असल्याचे निदर्शनास आले होते.

यंदा या तंत्रशास्त्र विद्यापिठातील लायब्ररीच्या इमारतीला मोठ्या प्रमाणात गळती सुरू झाल्याने लायब्ररीतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या दालनाचे चक्क ताडपत्री आणि बादल्यांचा वापर करून गळक्या स्लॅबच्या छप्परातील पाणी वेचण्याचे काम दररोज युध्दपातळीवर सुरू झाले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या व्हाटसअॅप ग्रुपवरून विद्यापिठ प्रशासनाचे स्लॅबगळतीकडे लक्ष वेधण्यासाठी आकाश फाटल्यामुळे ठिकठिकाणी लावलेल्या ताडपत्री तसेच प्लॅस्टीक शीटस् आणि जागोजागी गळणारे पाणी वेचण्यासाठी लावलेल्या बादल्यांची दृश्ये छायाचित्रीत करून व्हायरल करूनही गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही गळती सहन करा, चारच तर महिने पाऊस असतो, अशा पध्दतीची समज विद्यापिठ प्रशासनाकडून संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

लोणेरे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ परिसरामध्ये अनेक इमारती उभारताना ठराविक ठेकेदाराचा प्रभाव दिसून येण्यासाठी कर्मचारीदेखील प्रयत्नशील असल्याने निविदांचे चक्रानुक्रम आणि बोगस निविदांचे सत्र यशस्वी होऊन इमारतीच्या बांधकामाचा दर्जा खालावत असल्याने आता गळती रोखण्यासाठीचे तंत्र व शास्त्र विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रशासनाकडून गंमतीने बोलले जात आहे.

बँक ऑफ इंडियाच्या शाखेत खातेदारांची गैरसोय

दै.रायगड नगरी । पनवेल

नेरे येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत खातेदारांची गैरसोय होत असल्याचे दिसून येत आहे. खातेदारांची होणा–या गैरसोईबाबत लवकरात लवकर लक्ष घालून समस्या सोडवावयात अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोषाला सामोरे जावे लागेल अशा आशयाचे निवेदन शाखा अधिकारी बँक ऑफ इंडीय शाखा नेरे याना देण्यात आले आहे.

नेरे येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेमधील बरेचसे खातेदार हे आदिवासी अशिक्षित आहेत. ज्यांना लिहिता वाचता येत नाही. त्यामुळे त्यांची पैसे भरणे व काढण्याची गैरसोय होत आहे. तरी त्यांची होणारी गैरसोय टाळण्याकरीता एक मदतनीस नेमण्याची मागणी केली जात आहे. शाखेच्या बाहेर मुख्य रस्त्यालगत एटीएम मशिन आहे. ती मशिन ब–याच वेळा कार्यन्वीत नसते. मागील पाच ते सहा दिवसांपासून मशिनला शटर लावून ती बंदच ठेवलेली आहे. त्यामुळे खातेदारांची अतिशय गैरसोय होत आहे. त्याचा परिणाम म्हणून खातेदार बँकेमध्ये धाव घेतात. तरी सदरची एटीएम मशिन खातेदारांसाठी लवकरात लवकर कार्यन्वीत करावी. तसेच शाखेमध्ये पैसे भरणे व काढणे यासाठी एकच काउंटरची सुविधा असल्यामुळे खातेदारांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. तरी पैसे भरणे व काढणे. यासाठी दोन स्वतंत्र काउंटर उघडावे. वरिल होणा–या गैरसोईबाबत आपण लवकरात लवकर लक्ष घालून समस्या सोडवाव्यात अशी मागणी मनसेचे विश्वास पाटील, कुणाल फडके, दिनेश मांडवकर, विदयाधर चोरघे यानी केली आहे.

छत्री दुरूस्ती : पावसाळ्यातील पुरक व्यवसाय

दै.रायगड नगरी । कोर्लई

अन्य व्यवसाया बरोबरच पावसाळ्यात छत्री दुरुस्ती व्यवसायाकडे पुरक व्यवसाय म्हणून पाहिले जात असून पावसापासून संरक्षण करण्यासाठी छत्र्यांना अधिक प्राधान्य दिले जाते, त्यातही एकदा छत्री घेऊन ती. दुसऱ्या वर्षांच्या पावसात दुरुस्त करून वापरणा–यांची संख्या मोठी आहे.

त्यामुळे सुरू झालेल्या पावसात छत्र्या दुरुस्त करणाऱ्यांच्या व्यवसायात वाढ झालेली आहे. छत्रीची तार बदलण्यासाठी वीस ते पंचवीस रुपये मोजावे लागत आहेत, तर दांडा बदलून घेण्यासाठी पन्नास ते साठ रुपये मोजावे लागत आहेत. छत्री दुरुस्तीसाठी विविध लागणा–या साहित्याच्या किमतीत यंदा ३० टक्क्याने वाढ झाली आहे. सध्या छत्र्यांमध्ये अनेक प्रकारच्या छत्र्या उपलब्ध असतानाही जुन्या छत्र्या दुरुस्त करून वापरणाऱ्यांचीही संख्या कमी नाही, ’जुने ते सोने’ म्हणत अनेक जण या छत्री दुरुस्त करणायांच्या व्यवसायालाही नकळतच हातभार लावीत आहेत. छत्री दुरुस्तीच्या व्यवसायातून पावसाळ्यात दिवसाला रोजगार मिळून कष्टाचे चीज होते. असे रेवदंडा येथील छत्री दुरुस्तीचा पारंपारिक व्यवसाय करणारे विजय बाबासाहेब गोळे यांनी सांगितले.

उरणात सर्पदंशाच्या घटनेत वाढ

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात सध्या पावसाळ्यात सर्पदंशाच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा सर्पदंश झालेल्या नागरीकांवर प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली व इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथे तात्काळ उपचार होत नसल्याने शेतकरी, नागरीकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

उरण हा तालुका अरबी समुद्राच्या व डोंगर परिसरात वसलेला तालुका असल्याने या तालुक्यात पावसाळ्यात सर्पदंशाच्या घटना या वारंवार घडत असतात. अशा सर्पदंश झालेल्या नागरीकांवर उपचार करण्यास प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली व इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथील वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर हे टाळाटाळ करत असतात.

त्यामुळे सर्पदंश झालेल्या नागरीकांना उपचारासाठी नवीमुंबई येथील रुग्णालयात ३५ कि.मी.चा अंतर पार करून जावे लागत आहे. त्यामुळे वेळीच उपचार न झाल्यास सर्पदंश झालेल्या नागरीकांना आपले प्राण गमवाण्याची वेळ आली आहे.

विठ्ठल नामाचा गजर घुमला ; नागरिकांचा उदंड प्रतिसाद

दै.रायगड नगरी । पनवेल

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विठ्ठल नामाचा गजर घुमला. भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड जिल्हा सांस्कृतीक सेल तर्फे आषाढी एकादशी व गुरुपौर्णिमेनिमीत्त ’भेटला विठ्ठल माझा’ हा सुश्राव्य गाण्याच्या सुरे मैफिलेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागरीकांना उदंड प्रतिसाद लाभला.

आषाढी एकादशी व गुरुपौर्णिमेनिमित्त भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने गुरुवारी सायंकाळी पनवेलमध्ये भेटला विठ्ठल माझा सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल आयोजित करण्यात आली होती, पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमात मराठी इंडियन आयडॉल स्पर्धेचा विजेते सागर म्हात्रे यांचा विशेष सत्कार तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील निवडक गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. या मैफिलीत गायक मेघना भावे, नचिकेत देसाई, प्रणय पवार यांनी सुरेल गिते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले तसेच त्यांना वादक विवेक भागवत, मनीष कुंबरे, प्रणय हरिदास, समीर कर्वे, विशाल माळी, झंकार कानडे, यांनी साथ दिली. या वेळी पनवेल महापलिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, भाजप सांस्कृतिक सेलचे कोकण प्रांत संयोजक राहुल वैद्य, सह संयोजिका अक्षया चितळे, सह संयोजक दीपक पवार, सांस्कृतिक सेलचे प्रदेश सदस्य सुनील सिंन्हा, प्रदेश सहसंयोजक मकरंद पाटील, सांस्कृतिक सेल जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, संजीव कुलकर्णी, सदस्य अमोल खेर, शहर संयोजक निखिल गोरे, वैभव बुवा यांच्यासह इतर पदाधिकारी आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विचुंबे गावात जाणाऱ्या पुलावरून अवजड वाहने व बस सेवा बंद

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल रेल्वे स्थानकाची पूर्व बाजू ते विचुंबे गावाला जोडणाऱ्या गाढी नदीवरील पूल हा एका बाजूला खचला असून तो धोकादायक बनला आहे. विचुंबे गावात जाण्यासाठी हा एकमेव मार्ग असून या पुलावरून जाणारी एनएमएमटीची बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे येथील प्रवाशांची गैरसोय होत आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने वेळीच या पुलाचे बांधकाम हाती घेतले असते तर ही वेळ आली नसती अशी संतापजनक प्रतिक्रिया येथील ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. पुलाची दुरुस्ती न झाल्यास प्रवाशांना तीन आसनी रिक्षांशिवाय पर्याय उरणार नाही. तर १० रुपये बसच्या तिकीट भाड्याचा प्रवास २० ते ३० रुपये खर्च करून करावा लागणार आहे. पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व बाजूस विचुंबे हे गाव आहे. स्थानकापासून काही मिनिटांच्या अंतरावर असलेल्या विचुंबे गावाच्या परिसरात उभारलेल्या अनेक इमारतींमधील स्वस्त घरांमुळे या परिसरात झपाट्याने लोकवस्तीवाढली आहे. परंतु या लोकवस्तीमधील नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यास प्रशासन असमर्थ ठरत आहे. अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र आणि पिण्याच्या पाण्याच्या असुविधेला तोंड द्यावे लागते. मात्र या गावात ये–जा करण्यासाठी तीन आसनी रिक्षांचा पर्याय सोडल्यास इतर सार्वजनिक बस सेवेसाठी नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन विभागाने ५९ क्रमांकाची जादा बस सेवा सुरू होती. करोनाकाळात ती दोन वर्षे बंद होती. काही दिवसांपूर्वीच ती सुरू करण्यात आली होती. स्थानक ते विचुंबे गावाच्या परिसरात ये–जा करण्यासाठी प्रवाशांची ही बस सेवा पुलाच्या दुरवस्थेमुळे बंद करण्याची वेळ ग्रामपंचायतीवर आली आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने २७ जून रोजी ग्रामपंचायतीला या पुलावरून हलकी वाहने वगळता अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी हा पूल बंद करण्याचे पत्र दिले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने एनएमएमटी प्रशासनाला पत्र पाठवून सध्या सुरू असणारी ५९ क्रमांकाची जादा बस सेवा बंद करावी असे कळविले आहे. दोन वर्षांपूर्वी पुलाचे सर्वेक्षण झाले असून पूल धोकादायक जाहीर करण्यात आला आहे. दुर्घटना घडल्यास ग्रामपंचायत जबाबदार ठरणार आहे. अवजड वाहने व बस सेवेची वाहतूक उसर्गी मार्गे करणे हा एकमेव पर्याय आम्हा ग्रामस्थांसमोर आहे. एक मोठी बस अरुंद पुलावरून गेल्यास दोन तास वाहतूक कोंडी होते, त्यामुळे बस वाहतूक बंद करावी लागत असल्याचे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे.

इनर व्हील क्लब पनवेलचा पदग्रहण सोहळा संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

इनर व्हील क्लब पनवेलचा पदग्रहण समारंभाची सुरुवात दीप प्रजवलाने व डॉक्टर अर्चना मेश्राम यांनी गायलेल्या गणेश वंदनाने झाली. सन २०२१–२२ च्या अध्यक्षा यांनी पदभार नूतन अध्यक्षांकडे सोपवण्या पूर्वी आपले मनोगत व त्यांनी वर्ष भरात केलेल्या महत्वाच्या उपक्रमांचा आढावा पीपीटी द्वारे घेतला.

या नंतर नूतन अध्यक्षा संजीवनी मालवणकर यांनी मावळत्या अध्यक्षा सुलभा निंबाळकर यांच्या कडून सन २०२२–२३ ह्या वर्षा करिता अध्यक्ष पदाची सूत्रे, कॉलर, पिन व क्लब चा चार्टर स्वीकारले. नूतन अध्यक्षा संजीवनी मालवणकर यांनी २०२२–२३ च्या कार्यकारिणीची ओळख करून दिली व सचिव स्वाती घांग्रेकर, खजिनदार शुभांगी पिंपळकर , i s o वंदना लघाटे, संपादिका डॉ वीणा मनोहर व सीसी सुलभा जोशी यांनीही पिन्स व आपापला पदभार स्वीकारला. आ प्रशांत ठाकूर व कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ, अध्यक्षा अहिल्या महिला मंडळ, पेण यांच्या उपस्थितीत हा सुंदर सोहळा तथास्तु हॉल, पनवेल येथे संपन्न झाला.

नूतन अध्यक्षा संजीवनी मालवणकर यांनी आपले मनोगत सादर केले व २०२२–२३ चे इनर व्हील चे घोष वाक्य work wonder नुसार अनेक लोक उपयोगी कामे करणार असल्याचे सांगितले. १ जुलै रोजी त्यांचा कार्यकाल सुरू झाल्या दिवशीच त्यांनी पनवेल मधील १३ दंत वैद्यांना सन्मानित केले. १३ जुलै रोजि जुन्या भाजी मार्केट जवळ सोलर ऊर्जे वर चालणारे मोबाईल चार्जिंग स्टेशन उभारून भाजी विक्रेते व कामगार यांचे आशीर्वाद घेतले. तसेच कार्यक्रमात आ. प्रशांत ठाकुर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ यांच्या अहिल्या महिला मंडळ, पेण यांच्या संस्थेला रु ५००० चा धनादेश दिला आणि पनवेल कुरुळकर विशेष मुलांच्या वस्ती गृहाला धान्याची मदत करून आपल्या कार्याची दमदार सुरुवात केली. आ. प्रशांत ठाकूर यांनी नूतन अध्यक्षा संजीवनी मालवणकर यांना उत्तम कार्य करण्यासाठी शुभेच्छा देऊन त्यांच्या उत्साहाचे कौतुक केले. इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३१३ च्या चेअरमन मुक्ती पानसे यांची व त्यांच्या कामाची ओळख डिस्ट्रिक्ट इएसओ डॉ शोभना पालेकर यांनी करून दिली. इनर व्हील क्लब मध्ये नव्या चार मैत्रिणीना सभा सदत्व प्रदान करण्यात आले, तर तीन जुन्या सभासदांनी परत एकदा क्लब चे सभा सदत्व स्वीकारले. नवीन सभा सदांना सभा सदत्वाची शपथ पीपी स्वाती जोशी यांनी दिली.

प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ यांची ओळख पीपी ऍड सुजाता चव्हाण यांनी करून दिली. प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ यांनी आपल्या भाषणात क्लब करीत असलेल्या कामाचे व उपक्रमाचे कौतुक केले व क्लब ने कायम स्वरूपी एखादा ठोस उपक्रम राबरावा असे सुचवले.

प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ यांच्या हस्ते संपादिका डॉ वीणा मनोहर यांनी संपादित केलेल्या क्लब च्या संकल्पसिद्धी या बुलेटिनचे व सीसी सुलभा जोशी यांनी तयार केलेल्या कळंब रोस्टरचे प्रकाशन झाले. उपाध्यक्षा पूर्णिमा हळदिपूरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले व वैजयंती बुवा, वंदना लघाटे व कानन मिरवणकर यांच्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सदर सूत्रसंचालन सुप्रिया कुलकर्णी व विनया सहस्त्रबुद्धे यांनी केले. शेवटी उपस्थितांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला.

Kamalgauri Hiru patil shikshan sanstha

B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY

(Affiliated to University of Mumbai and MSBTE,
Approved by AICTE, DTE, PCI and Govt.of Maharashtra)

Address:-Plot no.29, Sec-11, Taloja Navi Mumbai

Walk In Interview

Applications are in invited for the following posts.

Sr.no.	post	Qualification	Designation
1	2	M.Pharm(Pharmacology)	Assistant professor
	2	M.Pharm(Medicinal Chemistry)	Assistant Professor
2	4	B.Pharm or M.Pharm	Lecturer
3	3	D.Pharm	Lab.Technician

Note:-Qualification and experience required as per AICTE and PCI Norms
Candidate may mail their resumes on kghpss.2019@gmail.com

Principal